रजिस्टर्ड नं. टीइएमएच ४७-३०३ मार्च-अप्रैल २०००

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, ऑक्टोबर १८, २०००/आश्विन २६, शके १९२२

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

# भाग एक—मध्य उप-विभाग

## अधिसूचना

महाराष्ट्र शासन

### वित्त विभाग, महाराष्ट्र राज्य लॉटरी

८ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ ऑक्टोबर २०००

## अधिसूचना

क्रमांक: मराला-१०००/प्र.क्र. १२७/लॉ-३. लॉटरी (विनियमन) अधिनियम, १९९८ (१९९८ चा अधिनियम क्र.१७) याच्या कलम १२ अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्यात किंवा महाराष्ट्र राज्याबाहेर करण्यांत येणा-या लॉटरी तिकीट विक्रीचे तसेच इतर राज्यांकडून महाराष्ट्र राज्यांत करण्यांत येणा-या लॉटरी तिकीटांच्या विक्रीचे विनियमन करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहे. :---

१. **संक्षिप्त नांव व प्रयुक्ति :**

(१) या नियमांना महाराष्ट्र राज्य लॉटरी (विनियमन) नियम, २००० भाग-१, असे म्हणावे.

(२) हे नियम महाराष्ट्र राज्यात अथवा राज्याबाहेर करण्यांत येणा-या लॉटरी तिकीटांच्या विक्रीचे आणि महाराष्ट्र राज्यांत इतर कोणत्याही राज्य शासनाच्या तिकीट विक्रीचे विनियमन करण्यासाठी लागू असतील.

(३) हे नियम राजपत्रामध्ये प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या :**

(१) या नियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, ---

(क) **"अधिनियम"** याचा अर्थ लॉटरी (विनियमन) अधिनियम, १९९८ (१९९८ चा अधिनियम क्र.१७);

(ख) **"जाहिरात अभिकरण"** याचा अर्थ महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या योजनांच्या प्रसिध्दीच्या प्रयोजनासाठी राज्य शासनाने नेमलेले अभिकरण;

(ग) **"अभिकर्ता"** याचा अर्थ राज्य शासनाने तिकीटांची विक्री करण्यासाठी जिच्याशी करार केलेला आहे, अशी राज्य शासनाने अभिकर्ता म्हणून नेमलेली व्यक्ती आणि त्यामध्ये एकमेव विक्री अभिकर्ता, एकगठ्ठा तिकीटे विकणार अभिकर्ते, वितरक किंवा अभिकर्त्यांनी लॉटरी तिकीटे विकण्यासाठी नियुक्त केलेली व्यक्ति यांचा अंतर्भाव होतो ;

(घ) **"करार"** याचा अर्थ संचालक व अभिकर्ता किंवा जाहिरात अभिकरणाचा मुद्रक किंवा यथास्थिति, कोणतेही अन्य अभिकरण यांच्यामध्ये झालेला करार;

(च) "बँकेची हमी" याचा अर्थ राष्ट्रीयीकृत बँकेने संचालकांच्या नावाने दिलेली हमी;

(छ) "बोनस" याचा अर्थ शासनाने वेळोवेळी जाहीर केलेली अभिकर्त्यांनी विकलेल्या बक्षिसपात्र तिकीटांवर अभिकर्त्यांना देण्यात येणारी रक्कम;

(ज) "कमिशन" याचा अर्थ लॉटरी तिकीट विक्रीसाठी अभिकर्त्यांना देण्यात येणारी दलाली ;

(झ) "संचालक" याचा अर्थ संचालक, महाराष्ट्र राज्य लॉटरी, महाराष्ट्र शासन;

(ट) "सोडत" याचा अर्थ सोडत यंत्र वापरुन किंवा यादृच्छिक पध्दतीवर आधारलेल्या कोणत्याही इतर यांत्रिक पध्दतीने प्रत्येक लॉटरीचे बक्षीसपात्र क्रमांक काढण्यात येतात अशी प्रेक्षकांना पारदर्शी असणारी पध्दती;

(ठ) "सोडतीचे पंच" याचा अर्थ राजपत्रित अधिकारी, राज्य लॉटरी संचालनालयाच्या कार्यासन अधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचे नसणारे अधिकारी किंवा या कामासाठी संचालकांनी जिला आमंत्रित केले आहे अशी कोणतीही प्रसिध्द व्यक्ति किंवा अनेक व्यक्ती;

(ड) "बयाणा रक्कम" याचा अर्थ अभिकर्ता म्हणून किंवा कोणत्याही इतर नात्याने शासनाशी करार करण्यासाठी आणि अंमलबजावणी करण्यासाठी शासनाकडे प्रतिभूती म्हणून अभिकर्त्याने जमा केलेली रक्कम;

(ढ) "प्रोत्साहन" याचा अर्थ लॉटरी तिकीटांचा खप वाढविण्यासाठी अभिकर्त्यांना दिलेली रक्कम;

(ण) "लायसन" याचा अर्थ राज्य शासनाने मान्य केलेल्या दराप्रमाणे शुल्क घेऊन तिकीट विकण्यासाठी अभिकर्त्यांना दिलेली परवानगी;

(त) "मुद्रक" याचा अर्थ लॉटरी तिकीटांची छपाई करण्यासाठी शासनाने जिच्याशी करार केलेला आहे, अशी व्यक्ती;

(थ) "बक्षिस" याचा अर्थ वरील खंड (ट) अन्वये ज्याचा क्रमांक आलेला आहे अशा बक्षीसपात्र तिकीटांसाठी देण्यात येणारी रक्कम;

(द) "खरेदीसाठी आगाऊ रक्कम" याचा अर्थ कराराच्या अटींनुसार तिकीटे उचलण्यासाठी अभिकर्त्याने आगाऊ भरणे आवश्यक असलेली रक्कम;

(ध) "राज्य शासन" किंवा "शासन" याचा अर्थ महाराष्ट्र शासन;

(न) "राज्य लॉटरी "याचा अर्थ राज्य शासनाने आयोजित केलेली, चालविलेली किंवा प्रवर्तित केलेली महाराष्ट्र राज्य लॉटरी ;

(प) "निविदा समिती " याचा अर्थ राज्य शासनाकडून चालविण्यात येणाऱ्या विविध राज्य लॉटऱ्यांसाठी अभिकर्त्यांची किंवा एक गठ्ठा तिकीट विक्री करणाऱ्या अभिकर्त्यांची नियुक्ती करण्यासाठी मागविण्यात येणाऱ्या निविदा विचारात घेण्यासाठी व त्या संदर्भात शिफारस करण्यासाठी तसेच लॉटरी तिकीटांच्या छपाईबाबत किंवा त्याच्याशी संबंधित बाबींबाबत विचार करण्यासाठी प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी स्थापन केलेली अध्यक्षाचा समावेश असलेली अधिकाऱ्यांची समिती ;

(फ) "तिकीट" याचा अर्थ ज्याच्यावर बक्षीस दिले जाणार आहे असे संचालकांनी छापलेले व विक्रीसाठी उपलब्ध करुन दिलेले राज्य लॉटरीचे तिकीट ;

(२) या नियमांमध्ये वापरलेले परंतु यात व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमात अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच त्यांचे अर्थ असतील.

**३. महाराष्ट्र राज्य लॉटरी मंडळ :**

(१) पुढील सदस्यांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र राज्य लॉटरी मंडळाकडून (यात यापुढे ज्याचा "मंडळ" असा निर्देश करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र राज्य लॉटरी योजनेची अंमलबजावणी करण्यात येईल. :-

| | | |
|---|---|---|
| (क) वित्तमंत्री | ... | अध्यक्ष |
| (ख) वित्त राज्यमंत्री | ... | उपाध्यक्ष |
| (ग) वित्त सचिव, वित्त विभाग | ... | सदस्य |
| (घ) सचिव, (व्यय) वित्त विभाग | ... | सदस्य |
| (च) सचिव, गृह विभाग | ... | सदस्य |
| (छ) अतिरिक्त पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) | ... | सदस्य |
| (ज) संचालक, लेखा व कोषागार | ... | सदस्य |
| (झ) संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने | ... | सदस्य |
| (न) संचालक, अल्पबचत व राज्य लॉटरी | ... | सदस्य सचिव |

(२) संचालनालयाच्या रचनात्मक व प्रशासकीय यंत्रणेच्या संपूर्ण कामकाजाची जबाबदारी मंडळाकडे राहील.

(३) मंडळ तीन महिन्यांतून एकदा किंवा अध्यक्ष आमंत्रित करील त्याप्रमाणे व तेव्हा बैठक आयोजित करील.

(४) संचालक, महाराष्ट्र राज्य लॉटरी योजना कार्यान्वित करील ज्याठिकाणी संचालकांकडे संपूर्ण प्रभार असेल अशा बृहन्मुंबई व्यतिरिक्त जिल्ह्यांतील राज्य लॉटरी योजनांचा संपूर्ण प्रभार जिल्हाधिकारी यांच्याकडे राहील.

(५) मंडळास अधिकार असेल आणि अशा लॉटरीमुळे राज्याला जास्तीत जास्त निव्वळ महसूल मिळावा म्हणून मंडळास आवश्यक व इष्ट वाटतील असे आस्थापनांचे आणि कार्यचालनांचे नियंत्रण करणारे नियम आणि विनियम प्रस्थापित करणे हे त्याचे कर्तव्य असेल.

**४. लॉटरी योजना तयार करणे आणि शर्ती विहित करणे :**

(१) राज्य शासन वेळोवेळी प्रस्तुत कराव्याशा वाटतील अशा वेगवेगळया लॉटरी योजना तयार करील.

(२) ज्यामध्ये पुढील तपशिलाचा अंतर्भाव असेल अशा योजना शासनाकडून अधिसूचित करण्यात येतील:-

(क) तिकीटाची किंमत,

(ख) विभिन्न व स्वतंत्र मालिकांमध्ये विनिर्दिष्ट तिकीटे काढण्यांत आली असतील अशा मालिका,

(ग) प्रत्येक सोडतीमध्ये विक्रीसाठी काढण्यांत यावयाच्या मालिकांची संख्या आणि प्रत्येक मालिकेतील तिकीटांची संख्या,

(घ) बक्षिसांची रचना,

(च) बक्षिसे काढण्याची कार्यपध्दती,

(छ) शासनाकडून हमी देण्यांत आलेल्या बक्षिसांच्या रकमा, आणि

(ज) कमिशन, प्रोत्साहनपर रक्कम व बोनस असल्यास.

(३) राज्य लॉटरी ही संचालकांकडून निश्चित करण्यांत येतील अशा इतर उप नावांसह, **"महाराष्ट्र राज्य लॉटरी"** म्हणून संबोधण्यांत येईल.

(४) राज्य शासन अभिकर्ता व मुद्रक यांना लागू असणा-या अर्हता, अनुभव व अटी आणि शर्ती घोषित करील.

(५) संचालक, बाजारातील परिस्थिती विचारांत घेवुन लॉटरी योजनेत किरकोळ बदल करु शकेल. तथापि, अशा प्रकारचे बदल करताना मंडळाला कळवील आणि मंडळाच्या पुढील बैठकीमध्ये अशा प्रकारचे बदल करण्यास त्याची मान्यता मिळवील.

**५. अभिकर्त्यांची नियुक्ती :**

(१) खुल्या निविदा मागवून आणि निविदा समितीच्या शिफारशींवरुन राज्य शासनाकडून किंवा त्यांच्या वतीने कोणत्याही प्राधिका-याकडून अभिकर्त्यांची नियुक्ती करण्यांत येईल. परंतु, लॉटरीच्या भव्यतम सोडतीमध्ये निविदा मागविण्यांत येतीलच असे नाही.

(२) जर भव्यतम सोडतींसाठी निविदा मागविण्यांत आल्या नाहीत तर कोणतीही व्यक्ती करार करुन करारातील अटी व शर्तीनुसार तिकीटांच्या किमान मर्यादेपर्यंत तिकीटे उचलू शकेल.

(३) राज्य शासन योग्य व पर्याप्त कारणांसाठी कोणत्याही अभिकर्त्याची एजन्सी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी योग्य संधी त्याला दिल्यानंतर केव्हाही रद्द करु शकेल. अशा अभिकर्त्याची कर्तव्ये पार पाडण्यांत शासनाला नियमबाहय गोष्टी आढळून आल्यास अशा अभिकर्त्याची अनामत रक्कम गोठविण्याची शासनास मुभा असेल. यासंबंधातील शासनाचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. या संबंधात, राज्य शासनाने वेळोवेळी संचालक व जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविलेल्या अधिकारांच्या मर्यादेपर्यंत संचालक व जिल्हाधिकारी राज्य शासनाच्या अधिकारांचा वापर करतील.

(४) राज्य शासनास अभिकर्त्याला लागू करता येतील अशा अर्हता, अनुभव आणि अटी व शर्ती विहित करता येतील.

**६. राज्य लॉटरी चालविणे :**

(१) राज्य शासन त्यांच्याकडून तिकीटांची विक्री करण्याकरिता किंवा अभिकर्त्यांमार्फत तिकीट विक्री करण्याकरिता, भांडारे उघडून, राज्य लाटरीचे आयोजन, संचालन किंवा प्रवर्तन करील.

(२) राज्य लॉटरीची तिकीटे या प्रयोजनाकरिता खास नियुक्त केलेल्या अधिकृत अभिकर्त्यांमार्फत जनतेला साधारणपणे उपलब्ध होतील.

(३) राज्य शासन व अभिकर्ते यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार तिकीट विक्रीचे विनियमन करण्यांत येईल.

(४) लॉटरी तिकीटांच्या विक्रीपासून प्राप्त आणि किंवा गोळा झालेले उत्पन्न शासकीय कोषागारात जमा करण्यांत येईल.

(५) अभिकर्त्यांना तिकीटांची विक्री, राज्यातील निर्गमनगळी उप कोषागार व जिल्हा कोषागार आणि मुंबईतील अधिदान व लेखा कार्यालय येथून करण्यात येईल. अशी विक्री, संचालकांचे कार्यालय किंवा अन्य कोणतेही शासकीय कार्यालय किंवा कार्यालये येथे दखील करण्यात येईल. अन्य कोणत्याही ठिकाणी विक्री करण्यास, शासनाच्या मान्यतेची आवश्यकता असेल. अभिकर्त्यांना तिकीटविक्री करणा-या कार्यालयांना संबंधित ठिकाणची विक्री कार्यालये असे संबोधण्यांत येईल.

(६) सोडतीची तारीख व वेळ तिकीटावरच दर्शविण्यांत येईल. सोडतीची तारीख, वेळ व जागा यांमध्ये फेरफार करण्याचा हक्क शासनाला असेल. तथापि, अशा फेरफारांना व सोडत ज्या तारखेस घेण्यात येईल त्या तारखेमध्ये सुधारणा करण्यांत आलेल्या तारखेला मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देण्यांत येईल.

(७) प्रत्येक सोडतीच्या संबंधात, अभिकर्त्यांना करण्यांत येणारी तिकीट विक्री सोडतीच्या वेळेस थांबविण्यांत येईल, आणि त्यानंतर सुरु करता येणार नाही. परंतु, संचालक, वेळोवेळी, विक्री थांबविण्याबाबतची वेळ निश्चित करु शकेल.

७. तिकीटांची छपाई :

(१) राज्य शासन, संचालकामार्फत तिकीटांची छपाई करण्याची व्यवस्था करील. छपाईवरील खर्च, राज्य शासनाकडून भागविण्यांत येईल.

(२) संचालक, अभिकर्त्याला किंवा यथास्थिति अभिकर्त्यांना दोघांच्या संमतीने निवडलेल्या ठिकाणी परंतु वरील नियम ६ (५) ला अधीन राहून, तिकीटांचे वितरण करण्याची व्यवस्था करील.

(३) संचालक, तिकीटांचा नमुना, आकार व संकल्पचित्र (डिझाईन) निश्चित करील.

(४) प्रत्येक सोडतीसाठी, तिकीटावर शासनाचा छाप व लोगो, तिकीट क्रमांक, सोडतीची तारीख व तिकीटांची किंमत छापलेली असेल.

(५) संचालक, आवश्यक असेल तर, तिकीट खरेदीदाराच्या माहितीसाठी आवश्यक आहे असे संचालकांना वाटले तर तो तिकीटाच्या मागच्या बाजूला, बक्षीस रचना व इतर आवश्यक तपशील व शर्ती इंग्रजीमध्ये छापील.

(६) पुस्तक स्वरुपातील किंवा संचालकाने निश्चित केल्याप्रमाणे अन्य कोणत्याही स्वरुपातील तिकीटे मुद्रकाकडून संचालकाला पाठविण्यांत येतील.

(७) संचालक, अभिकर्त्यांना किंवा लॉटरी संचालनालयाच्या अधिका-यांना विक्रीसाठी तिकीटे देईल.

८. तिकीट विक्रीवरील बंदी :

एखाद्या राज्यात किंवा क्षेत्रात तिकीट विक्रीला बंदी असल्यास, तेथे अभिकर्त्यांकडून तिकीट विक्री केली जाणार नाही.

९. इतर राज्यांनी लॉटरी तिकीटांची विक्री करणे :

(१) अन्य कोणत्याही राज्यास महाराष्ट्र राज्यामध्ये, अशा राज्यांकडून लॉटरीचे आयोजन, संचालन व प्रवर्तन करण्यांत आलेल्या एखाद्या लॉटरीच्या तिकीटांची विक्री करता येईल. मात्र महाराष्ट्र राज्यामध्ये तिकीटांची विक्री करण्यापूर्वी या राज्यांनी तिकीट विक्रीची संपूर्ण तपशीलवार योजना आणि संबंधित साहित्य जसे नमुना तिकीटे, सोडत संख्येबाबत माहिती आणि त्यांचे अधिकृत अभिकर्ते व वितरक यांची यादी आणि संचालकांना आवश्यक असणारी लॉटरी योजनांशी संबंधित सर्व माहिती सादर करणे आवश्यक आहे, जेणेकरुन, संचालकांना, महाराष्ट्र राज्यामध्ये आयोजित केल्याप्रमाणे अशा राज्यातील लॉटरी योजना या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचा भंग करणा-या नाहीत याची तपासणी करता येईल.

परंतु, महाराष्ट्र राज्यामध्ये स्वतःची तिकीटे विकणा-या कोणत्याही राज्याला ज्यामुळे लोकांची अशी दिशाभूल होईल की, उक्त लॉटरी महाराष्ट्र शासनाकडून चालविण्यांत किंवा नियंत्रित करण्यांत येत आहे अशा एखाद्या नावाचा किंवा लॉटरीच्या नावाच्या आधी किंवा नंतर जोडण्यांत येणा-या नावाचा (म्हणजेच मुंबई, महाराष्ट्र, महाराष्ट्रातील शहरांची नावे किंवा जे नावाच्या आधी किंवा नंतर किंवा अन्यप्रकारे वापरता येईल असे कोणतेही इतर नाव) वापर करता येणार नाही आणि शासनाची अशी खात्री झाली असेल की, अशा (नावाच्या) वापरामुळे ती लॉटरी महाराष्ट्र राज्याकडून चालविण्यांत किंवा नियंत्रित करण्यांत येत आहे अशी लोकांची दिशाभूल होत आहे किंवा होण्याचा संभव आहे त्याबाबतीत शासनास, महाराष्ट्र राज्यामध्ये अशी तिकीटे विकण्यास मनाई करता येईल.

(२) राज्य शासन, स्वतःहून किंवा त्याबाबतीत मिळालेल्या एखाद्या तक्रारीवरुन महाराष्ट्र राज्यात इतर कोणत्याही राज्यांनी आयोजित केलेल्या, चालविलेल्या किंवा प्रवर्तित केलेल्या एखाद्या लॉटरीच्या तिकीटांची विक्री ही या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करीत आहे, अशी

आवश्यक पाहतींची तपासणी केल्यानंतर राज्य शासनाची खात्री पटल्यास, महाराष्ट्र राज्यामध्ये अशा विक्रीस मनाई करील आणि या अधिनियमाच्या कलम ६ अन्वये संबंधित बाबींची माहिती भारत सरकारला देऊन याबाबतीतील आदेशाची माहिती करील.

**टीप - कोणत्याही प्रकारे तिकीटांचा एकत्र गट करणे किंवा एका कागदाच्या तुकडयावर एकापेक्षा जास्त तिकीटे छापणे किंवा अशाप्रकारे तिकीटांचा एकत्र गट करुन विक्री करणे हे लॉटरी (नियमन) अधिनियम, १९९८ च्या कलम ४ (अ) चे उल्लंघन असल्याचे मानण्यात येईल.**

१०. **सोडत काढणे :**

(१) ज्या ठिकाणी सोडत काढण्यांत येणार असेल ते ठिकाण व सोडतीची वेळ यांना मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी देण्यांत येईल. सोडत, महाराष्ट्र राज्यामध्ये, सार्वजनिक ठिकाणी काढण्यांत येईल, आणि संचालकाने सोडतीची देखरेख करण्यासाठी विशेषतः नियुक्त केलेल्या नामिकेच्या उपस्थितीत काढण्यांत येईल. सर्व सोडतीच्या प्रयोजनाकरिता, नामिकेमध्ये अध्यक्षासह तीन सदस्यांपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांचा समावेश असेल. दोन सदस्यांची मिळून गणपूर्ती होईल. कोणत्याही कारणास्तव, सोडतीच्या वेळी अध्यक्ष उपस्थित राहण्यास असमर्थ असेल तर, संचालक, नामिकेतील एका सदस्याला किंवा कोणत्याही अधिका-याला अध्यक्ष म्हणून काम करण्याची विनंती करील. कोणत्याही कारणास्तव सोडतीच्या वेळी गणपूर्ती झाली नाही तर, संचालक, एका योग्य त्या वरिष्ठ अधिका-याला नामिकेतील सदस्य म्हणून काम करण्याची विनंती करील.

(२) बक्षीस हमीपात्र असेल अशा लॉटरीच्या बाबतीत, संचालकांकडून यथोचितरित्या अधिप्रमाणित केलेली यादी विक्रीसाठी काढलेल्या तिकीटांच्या मालिकांची चिन्हे दर्शविणारी आणि मालिकांमध्ये काढलेल्या तिकीटांच्या क्रमांकाची यादी दर्शविणारी यादी नामिकेला उपलब्ध करुन देण्यांत येईल. विक्री न झाल्यामुळे शासनाकडेच राहिलेल्या तिकीटांची यादीसुध्दा संचालकांकडून काढण्यांत येईल आणि सोडतीस प्रारंभ होण्यापूर्वी यथोचितरित्या अधिप्रमाणित करण्यांत येईल व नामिकेला सादर करण्यांत येईल.

(३) संचालक, सर्व प्रकारच्या राज्य लॉट-यांकरिता, सोडतीची वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ७.०० च्या दरम्यान निश्चित करील.

(४) संचालकांकडून एकदा निश्चित करण्यांत आलेली सोडतीची तारीख व वेळ साधारणपणे बदलण्यांत येणार नाही. तथापि, बाजारातील स्थिती किंवा अन्य कोणत्याही अनपेक्षित कारणावर अवलंबून असलेल्या अपवादात्मक परिस्थितीत संचालक, सोडतीची तारीख व वेळ यामध्ये बदल करील.

११. **सोडतीच्या पंचांना परिश्रमिक :**

पंचांना, राज्य लॉटरी संचालनालयाचे अधिकारी वगळून सोडतीच्या प्रत्येक पंचास राज्य शासनाकडून ठरविण्यांत येईल असे परिश्रमिक देण्यांत येईल.

१२. **अभिकर्त्यांनी तिकीटे उचलणे :**

(१) लॉटरी योजनेनुसार, अभिकर्ता मान्यताप्राप्त दराने आवश्यक खरेदीची आगाऊ रक्कम भरुन सोडतीच्या एक किंवा दोन किंवा यथास्थिति तीन आठवडे आधी किंवा त्याबाबतीत संचालक निदेश देईल अशी विशिष्ट क्रमांकाची तिकीटे उचलील.

(२) शासनाकडून एकमेव विक्री अभिकर्त्यांची नियुक्ती करण्यांत आली असेल त्याबाबतीत संचालक व अभिकर्ता यांच्यामध्ये झालेल्या कराराच्या अंमलबजावणीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, पहिली सोडत आयोजित करण्यांत येईल. अभिकर्त्यांकडून झालेल्या कोणत्याही कसुरीमुळे पहिली सोडत ठरलेल्या वेळेत काढण्यांत आली नाही तर अभिकर्त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल. परंतु, शासनास पहिली सोडत काढण्याचा कालावधी, लोक हिताच्या दृष्टीने वाढविणे आवश्यक आहे असे वाटल्यास त्यास तो कालावधी वाढविता येईल.

(३) अभिकर्त्याने करारानुसार तिकीटे उचलली नाहीत तर, बक्षिसाची देय रक्कम वजा करुन तिकीटांच्या बीजक मूल्य रकमेइतकी नुकसानभरपाईची रक्कम अभिकर्त्याला भरावी लागेल.

(४) अभिकर्त्याला किंवा मुद्रकाला निविदा समितीने ठरविलेल्या रकमेएवढी बँक हमी द्यावी लागेल लॉटरीच्या भव्यतम सोडतीच्या बाबतीत बँक हमी किंवा सुरक्षा रक्कम राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने संचालकांकडून मान्य करण्यांत यावयाच्या लॉटरीच्या विशिष्ट सोडतीमध्ये तरतूद केल्याप्रमाणे असेल.

(५) छापील तिकीटांमध्ये कोणताही दोष किंवा उणीव आढळल्यास, तो संचालकांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल. अ... परिस्थितीमध्ये सदोष तिकीटे विकण्यात येणार नाहीत. खरेदीदारास किंवा यथास्थिति अभिकर्त्यास अभिकर्त्यांना सदोष तिकी... बदल्यात अचूक क्रमांकाची तिकीटे मिळू शकतील.

(६) तिकीटे पाठवण्याच्या काळात कोणत्याही वैध कारणांमुळे तिकीटे गहाळ झाल्यास, सदर बाब संचालकांकडून वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येईल. तथापि, एकदा तिकीटे अभिकर्त्यांकडे किंवा यथोचितरित्या अधिकृत करण्यात आलेल्या त्याच्या उप अभिकर्त्यांकडे सुपूर्द केल्यावर आणि कोणत्याही कारणांमुळे तिकीटे गहाळ झाल्यास, अभिकर्त्याला कोणत्याही प्रकारची नुकसानभरपाई देण्यांत येणार नाही.

(७) अभिकर्त्यांना विकण्यांत आलेली तिकीटे शासनाकडून कोणत्याही परिस्थितीत परत घेतली जाणार नाहीत.

## १३. अभिकर्त्यांकडून बाजारात विक्रीसाठी घेतलेली तिकीटे काढून घेणे :

अभिकर्त्यांची स्वतःच्या इच्छेनुसार बाजारातील तिकीटांची विक्री थांबविण्याची इच्छा असेल तर, तो पंचेचाळीस दिवसांची पूर्व सूचना देईल किंवा संबंधित लॉटरी योजनेसाठी करण्यांत आलेल्या करारानुसार शास्ती देईल.

## १४. निकाल प्रसिध्द करणे :

संचालकांकडून सोडतीचा निकाल वेगवेगळ्या वर्तमानपत्रांमधून, इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे तसेच महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यांत येईल. अशी प्रसिध्दी कायद्याच्या प्रयोजनांकरिता निकालांची अधिकृत घोषणा असल्याचे प्रस्थापित करील. निकालाची प्रमाणित प्रत सोडतीनंतर तात्काळ अभिकर्त्याला पुरविण्यांत येईल.

## १५. बक्षिसांची रक्कम देणे :

(१) अभिकर्ता, महाराष्ट्र शासन, राजपत्रामध्ये निकाल प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, राज्य शासनाच्या वतीने, बक्षीस विजेत्याला, रुपये पाच हजार पर्यंतचे बक्षीस (त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यान्वये आवश्यक असलेली आयकराची रक्कम वजा केल्यानंतर) देईल, आणि सोडतीच्या दिनांकापासून एकशे वीस दिवसांच्या कालावधीत प्रतिपूर्तीची रक्कम, कोणतीही असल्यास, घेईल. राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने प्रतिपूर्तीचा कालावधी संचालकांकडून वाढविण्यांत येईल.

(२) रुपये ५०००/- पेक्षा जास्त नसलेली बक्षिसाची रक्कम अभिकर्त्यांकडून अदा केली असल्यास अभिकर्त्यांना राज्य शासनाकडे त्याची मागणी करता येईल.

(३) रुपये ५०००/- पेक्षा जास्त बक्षिसाची रक्कम संचालक, राज्य लॉटरी यांच्याकडून थेट देण्यांत येईल. सदर बक्षिस रकमेचे मागणी देयक या नियमासोबतच्या नमुना "अ" मध्ये बक्षिस विजेत्या तिकीटासोबत सादर करण्यांत येईल. बक्षिस विजेत्यास, बक्षिसाची मागणी व्यक्तीगतरित्या सादर करण्याची आवश्यकता नाही किंवा कोणत्याही प्रकारची ओळख बक्षिस विजेत्याला दाखविण्याची आवश्यकता असणार नाही. बक्षिसाची रक्कम बक्षिसपात्र तिकीटाच्या मागे व ज्यांना बक्षिसपात्र तिकीट जोडले आहे अशा मागणी केलेल्या देयकावर स्वाक्षरी करणा-या व्यक्तीला दिली जाईल. बक्षिस रकमेची मागणी अधिसूचित बँक, सहकारी बँक ज्यांची कार्यालये राज्यात आहेत, अशा बँकामार्फत किंवा जर लेखी विनंती केली असल्यास, मागणी करणा-यास मनीऑर्डरद्वारे, मनिऑर्डरचे कमिशन कापून किंवा रेखांकित धनादेशाद्वारे प्रत्यक्ष किंवा पोस्टाने पाठविली जाईल. फाटलेले, चुरगळलेले किंवा खराब झालेले कोणत्याही प्रकारचे तिकीट बक्षिस विजेते तिकीट म्हणून व वैध तिकीट म्हणून कोणत्याही बक्षिसासाठी गृहीत धरले जाणार नाही. परंतु शासन गुणवत्तेच्या आधारावर अशा बाबतीत स्वेच्छा अधिकारात निर्णय घेईल.

(४) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात निकाल प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत बक्षिस विजेत्याने बक्षिसांची मागणी न केल्यास, सदर रकमेचे संवितरण केले जाणार नाही व सदर रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा होईल.

परंतु असे की, उपरोक्त ३० दिवसांचा कालावधी संपल्यानंतर, परंतु निकालाच्या प्रसिध्दीपासून ९० दिवसांच्या कालावधीत, संचालक बक्षिस विजेत्याला त्याच्या लेखी अर्जामध्ये नमूद केलेल्या विलंबाच्या संयुक्तिक कारणावरुन बक्षिसाची रक्कम देईल.

परंतु आणखी असे की, पुढील ९० दिवसांचा कालावधी संपल्यानंतर परंतु निकालाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन हे बक्षिस विजेत्याने अर्जामध्ये लेखी नमूद करावयाच्या संयुक्तिक कारणांसाठी बक्षिसाच्या रकमेचे प्रदान करतील.

सदर सोडतीच्या दिनांकानंतर, सोडतीचा दिवस सोडून ६ महिन्यानंतर व ३ वर्षापेक्षा जास्त नसलेल्या कालावधीत प्राप्त आलेल्या मागणीचा शासन गुणवत्तेच्या आधारे विचार करु शकेल.

(५) सर्व बक्षिस विजेत्या तिकीट धारकांना भारतीय चलनामध्ये रक्कम अदा केली जाईल.

(६) एका तिकीटावर तिकीटधारकाला एकाच बक्षिसाची मागणी करता येईल. जर एका तिकीटाला एकापेक्षा अधिक बक्षिसे लागली असतील तर तिकीटधारक सर्वात जास्त रकमेच्या बक्षिसासाठी पात्र ठरविला जाईल.

(७) सदर तिकीटाच्या खरेपणाबद्दल काही संशय आल्यास, संचालक सदर तिकीटांची मुद्रणालयाकडून किंवा न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोग शाळेकडून किंवा इतर प्राधिकरणाकडून पडताळणी करुन घेऊ शकेल.

१६. सनदी लेखापालाची नियुक्ती :

संचालक, राज्य लॉटरी चालविण्याच्या संबंधातील सर्व लेख्यांची स्वतंत्रपणे लेखापरीक्षा करण्यासाठी कोणत्याही सनदी लेखापालाची किंवा समतुल्य शैक्षणिक अर्हता असलेल्या कोणत्याही इतर व्यक्तीची नियुक्ती करेल. तिकीटांची तसेच बक्षिसपात्र तिकीटांची मोजणी व तपासणी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहील.

नियुक्त केलेला सनदी लेखापाल राज्य लॉटरी चालवित असलेल्या लॉटरीतून मिळत असलेल्या महसुलात वाढ करण्यासाठी सल्ला देईल.

१७. अल्पवयीन व्यक्तीस प्रदान :

बक्षिस विजेती व्यक्ती अल्पवयीन असल्यास बक्षिसाची रक्कम सदर व्यक्तिच्या नैसर्गिक पालकास, सदर व्यक्तीच्या योग्य पालकत्वाचा समाधानकारक पुरावा संचालकांकडे सादर केल्यास त्या पालकाला प्रदान करण्यांत येईल. जर पालकत्वाचा पुरावा सिध्द झाला नाही तर बक्षिसाची रक्कम राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रामध्ये जमा केली जाईल आणि बक्षिसाची पूर्ण रक्कम सदर अल्पवयीन बक्षिसपात्र व्यक्ती प्रौढ झाल्यानंतर व्याजासह त्या व्यक्तीस प्रदान करण्यांत येईल.

१८. आयकर कापून घेणे :

बक्षिसाच्या रक्कमेवर आयकर लागू होत असल्यास बक्षिसाची रक्कम प्रदान करण्याच्या वेळी आयकराची रक्कम कापून घेण्यांत येईल.

१९. नुकसान भरपाई :

अभिकर्त्यांच्या, मुद्रकाच्या किंवा यथास्थिती जाहिरात अभिकरणाच्या दुर्लक्षामुळे, हलगर्जीपणामुळे शासनाचे नुकसान किंवा तोटा झाला असेल त्या प्रकरणी त्याची भरपाई संबंधित अभिकर्ता, मुद्रक किंवा जाहिरात अभिकरण यांच्याकडून करण्यांत येईल.

२०. अनावश्यक अभिलेख काढून टाकणे :

सोडत संपल्यानंतर वेगवेगळया प्रकारचे अभिलेख संचालक, राज्य लॉटरी यांच्या अभिरक्षेत ठेवण्यांत येतील. सोडत संपल्यानंतर जास्त कालावधीसाठी आवश्यक नसणारा अभिलेख संचालकांच्या कार्यालयातील सुरक्षा कक्षात जास्तीत जास्त ३ वर्षांसाठी ठेवण्यांत येईल. त्यानंतर अभिलेख नष्ट करण्याच्या दिनांकाच्या एक महिना आधी महालेखापाल, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयास यासंबंधातील निर्णय कळवून तो नष्ट करण्यांत येईल.

२१. विवादाचा निर्णय :

एखाद्या विवादाच्या प्रकरणी राज्य शासनाचे सचिव, वित्त विभाग हे अंतिम प्राधिकारी असतील आणि त्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

२२. सूट :

नैसर्गिक आपत्ती किंवा अभिकर्ता, मुद्रक यांच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे नुकसान झाल्यास, राज्य शासनाला योग्य वाटले तर यथास्थिती सदर अभिकर्त्याला किंवा मुद्रकाला शासन सूट देईल.

२३. अर्थ लावणे :

जर या नियमांच्या अर्थ उकलीच्या किंवा त्याच्याशी संबंधित कोणत्याही इतर बाबतीत एखादा प्रश्न उद्‌भवल्यास तो शासनाकडे निर्देशित करण्यात येईल आणि त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

२४. निरसन :

महाराष्ट्र राज्य लॉटरी नियम, १९८५ हे याद्वारे निरसित करण्यांत येत आहेत.

# महाराष्ट्र राज्य लॉटरी (विनियमन) अधिनियम, २००० भाग १

नमुना 'अ'

[नियम १५(३) पहा]

## बक्षिसाच्या रकमेसाठी करावयाच्या मागणीचे देयक

**सेवा शीर्ष.**—२६८, संकीर्ण—सर्वसाधारण सेवा—राज्य लॉटरी बक्षिसादाखल द्यावी लागणारी रक्कम—बक्षिसांच्या रकमांचे प्रदान

बक्षीस विजेत्याचे नाव व पूर्ण पत्ता ...

वडिलांचे/पतीचे/पालकांचे नाव ...

मालिकेतील वर्णांच्या खुणेसह बक्षीस विजेत्या तिकिटांच्या क्रमांक ...

बक्षिसांच्या क्रमांक ...

बक्षिसांची रक्कम ... रुपये ..........................

वर उल्लेखिलेल्या आणि या सोबत जोडलेल्या बक्षीस विजेत्या टिकिटांवर देय असलेली बक्षिसांची एकूण रक्कम :—
रुपये ........... (रुपये ........................... फक्त) आज दिनांक .................. रोजी मिळाली.

**सहपत्रे :** बक्षीस विजेते तिकीट

महसुली मुद्रांक

ठिकाण

मागणीदाराची सही ...............

---

(कोषागार/उपकोषागार/अधिदान व लेखा कार्यालय यांच्या उपयोगासाठी)

१. दिनांक .......... च्या **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या बक्षीस विजेत्या क्रमांकाच्या सूचीवरून/संचालक, राज्य लॉटरी यांच्याकडून मिळालेल्या सोडतीच्या निकालाच्या प्रतीवरून त्याची पडताळणी केली.

२. या कोषागाराकडून/उपकोषागाराकडून/अधिदान व लेखा कार्यालयाकडून यापूर्वी ह्या तिकिटांची रक्कम देण्यात आलेली नाही याची पडताळणी केली आहे.

कोषागार अधिकारी/उपकोषागार अधिकारी/
अधिदान व लेखा अधिकारी
जिल्हा ......................

रुपये ............ (रुपये ................................ फक्त) अदा करावे.

कोषागार अधिकारी/उपकोषागार अधिकारी/
अधिदान व लेखा अधिकारी
जिल्हा ......................

दिनांक :

(महालेखापाल कार्यालयाच्या उपयोगाकरिता)

रुपये ................................ स्वीकृत करण्यात आले.

रुपये ................................ आक्षेप करण्यात आले.

आक्षेपाचे कारण ................................

लेखा परीक्षक | कक्ष अधिकारी | राजपत्रित अधिकारी

---

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

(स्वाक्षरित) रवि बुद्धिराजा
महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव,
वित्त विभाग